आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

फेब्रुवारी 2023

वर्ष तेरावे, पुरवणी अंक ४, खंड. १

संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

कार्यकारी संपादक
डॉ. शिवाजीराव देशमुख

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन
'प्रणव' रुक्मिणी नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५
मुद्रक: श्री. जे प्रिंटिंग प्रा लिमिटेड १४१६ सदाशिव पेठ पुणे- ४११०३०
साहित्य व वर्गणी पाठवण्याचा पत्ता: डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव' रुक्मिणी नगर, थोडगा रोड, अहमदपूर,
जि. लातूर, ४१३५१५
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

वार्षिक वर्गणी: रु ५००/-
द्विवार्षिक वर्गणी : रु ९००/-
पंचवार्षिक वर्गणी : रु २०००/-
अंक मूल्य : रु १२५/-

- महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ या नियतकालकाच्या प्रकाशनात अनुदान दिले असले तरी या नियतकालिकेतील लेख लेखांच्या विचाराशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.
- या अंकातील लेखातून व्यक्त झालेले लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असं नाही.

Sakri (Dhule)
PRINCIPAL
C.B.S's Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B. S. Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist Dhule
Scanned with OKEN Scanner

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010
ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

# "आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि आदिवासींमधील सामाजिक बदल"

डॉ. शरद बाबुराव सोनवणे
सहयोगी प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग,
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला वकै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,
साक्री जि.धुळे – 424304
Email– sharadpolsci@gmail.com

**प्रस्तावना**

आफ्रिकेच्या नंतर भारतात जगातील सर्वात मोठी आदिवासी लोकसंख्या आहे. भारतात ब्रिटिश राजवटीच्या काळात ब्रिटिश नागरी सेवकांचे भारतातील आदिवासी जमातींचा अभ्यासाकडे लक्ष वेधले गेले. त्यांनी आदिवासींची संस्कृती आणि चालीरिती यांचे वर्णन करणारी पुस्तके लिहिली. मात्र हे अभ्यास शास्त्रीय स्वरूपाचे नव्हते. तरीदेखील त्यामधून आदिवासींची वांशिकता व भारतातील विविध सांस्कृतिक गटांची मूलभूत माहिती मिळते. आदिवासींची स्थानिय संस्कृती विचारात घेतल्यास भारतातील आदिवासी हे सामाजिक व आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर असल्याचे दिसते. आधुनिक काळात तंत्रज्ञानातील विकासाचा प्रभाव भारतातील काही आदिवासी जमातींच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनावर पडत आहे. प्रस्तुत लघुशोध निबंधात नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनावरीलतंत्रज्ञानाच्या प्रभावाचा अभ्यास केला आहे.

**आदिवासी जमाती**

आदिवासी जमात यांचा इतिहास प्राचीन काळापासून मिळतो. आदिवासी हेच या देशाचे मूळनिवासी आहेत. जगात विविध देशात त्यांना विविध नावाने संबोधले जाते. अमेरिकेतील रेड इंडियन, ऑस्ट्रेलियात ॲबॉरिजील, युरोपात जिप्सी, आफ्रिकेत निग्रो तर आशियात आदिवासी या नावाने ओळखले जाते. आफ्रिका खंडानंतर आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो व भारतात आदिवासींना विविध नावाने ओळखले जाते. युरोपातआधुनिकीकरणाची प्रक्रिया अधिक वेगाने झाल्यामुळे तेथील आदिवासी जमाती प्रगत झाल्याअसल्यामुळे त्यांना ओळखणे कठीण झाले आहे.

**आदिवासी: अर्थ व व्याख्या**

आदिवासी कोण आहेत किंवा कोणास आदिवासी म्हणावे यासंबंधी सर्वच अभ्यासकांचा दृष्टिकोन समान असला तरी त्यांनी आदिवासींसाठी वेगवेगळ्या संज्ञा वापरल्या आहेत. सामान्यपणे नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे 'आदिवासी' असे म्हणता येते. साधारणत: जंगलात, दुर्गम दऱ्याखोऱ्यात व सुसंस्कृत समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशातआदिवासी तुरळक वास्तव्य करून राहतात. नागर संस्कृतीचा व वर्गश्रेणीबद्ध समाजाचा संपर्क न झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरीती / संस्कृती आदिवासींमध्ये आढळतात. पण जगातील सर्व आदिवासी हे त्या-त्या प्रदेशातील मूळ रहिवासी आहेतच असे ठामपणे म्हणता येत नाही. मात्र दुसऱ्या सर्वमान्य संज्ञेच्या अभावी आदिम संस्कृती'दर्शक अशी 'आदिवासी' हीच संज्ञा रूढ झाली आहे. अनेक नागर संस्कृतीचे उदयअस्त झाले, परंतु त्यांच्याशी संपर्क न साधल्यामुळे किंवा न आल्यामुळे आदिवासी जमाती जशाच्या तशा राहिल्या व हजारो वर्षे त्यांच्यात परिवर्तन झाले नाही.[1]

आदिवासी हा इंग्रजीतील 'ॲबॉरिजिनीज' या शब्दाचा रूढ मराठी पर्याय आहे. त्यांना वनवासी म्हणावे, आदिवासी म्हणू नये असाही एक दृष्टिकोन आहे. आदिवासींची वेगळी अस्मिता किंवा संस्कृती नसून ते इतरांप्रमाणेच आहेत, फक्त ते वनात वस्ती करून राहतात एवढाच त्यांचा वेगळेपणा आहे. बरेच आदिवासी गट डोंगर कपाऱ्यात राहत असल्यामुळे त्यांना अलीकडे 'गिरिजन' म्हटले जाते. एका विशिष्ट आदिवासी गटास जमात म्हणूनही संबोधण्यात येते. उदा. वारली जमात, ठाकूर जमात आदी. आदिवासी समाजासाठी इंग्रजीत 'ॲबॉरिजिनीज' या शब्दाव्यतिरिक्त इतरही काही शब्द आहेत. 'प्रिमिटिव्ह' म्हणजे आदिवासी किंवा अप्रगत लोक. 'सॅव्हेज' म्हणजे मागासलेले किंवा रानटी लोक. अर्थात प्रिमिटिव किंवा सॅव्हेज या शब्दांमधून आदिवासींचा मागासलेपणा,



Sakri (Dhule)
PRINCIPAL
C.S.S's Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist Dhule
Scanned with OKEN Scanner

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010
ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

अज्ञान व भोळेपणाही सूचित होतो. आदिवासी शब्दास निसंदिग्ध असा अर्थ प्राप्त करून देणे हे मानवशास्त्रातील आजही न सुटलेले कोडे आहे. आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने आदिवासींना तद्देशीय (इंडिजिनस) संबोधण्याची शिफारस केली आहे. कारण आदिवासी संस्कृतीची घडण ही इतर संस्कृतीच्या संपर्काशिवाय स्वतंत्ररीतीने झालेली असल्याचे त्यांचे मत आहे. आदिवासींना निरक्षर समाज म्हणून संबोधण्याचीही शिफारस करण्यात आली होती. आदिवासी बोलींना लिपी नसल्यामुळे आदिवासी समाज निरक्षर असतात असा तो दावा आहे. अलीकडील मानवशास्त्रीय लिखाणात आदिवासी समाजाचा उल्लेख निरक्षर समाज असाच करण्यात येतो.[2]

मानवशास्त्रामुळे आदिवासींच्या अभ्यासाला विशेष महत्व प्राप्त झाले असून मानवशास्त्रज्ञांच्या मते, आधुनिक जटिल संस्कृतींचा अभ्यास करण्यापूर्वी आदिवासींच्या साध्या व सरळ संस्कृतीचा अभ्यास जास्त संयुक्तिक ठरतो. कारण साध्या संस्कृतीचा अभ्यास केल्याने मानवीय व्यवहाराची मूलभूत तत्वे शोधून काढणे आणि त्याआधारे जटिल संस्कृतींना समजून घेण्याचा प्रयत्न करणे अधिक सोपे व उपयुक्त ठरते. मानव समाजाच्या सर्व घटकांचा सारखा विकास घडवून आणण्यासाठी आदिवासींचीही प्रगती झाली पाहिजे, या दृष्टिकोनातूनही आदिवासींच्या अभ्यासाला अलीकडच्या काळात महत्व प्राप्त झाले आहे.[3]

1962 मध्ये शिलॉंग येथे भरलेल्या 'आदिवासी परिषदेत' आदिवासी या शब्दाची पुढीलप्रमाणे व्याख्या करण्यात आली आहे. "एका समान भाषेचा वापर करणारा आणि एकाच पूर्वजांपासून उत्पत्ती सांगणारा, विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारा, तंत्रज्ञानदृष्ट्या मागास आणि अक्षर ओळख नसलेला, रक्तसंबंधावर आधारित सामाजिक, राजकीय रीतीरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणारा एकजिनसी गट म्हणजे आदिवासी समाज होय."[4]

जागतिक स्तरावर आदिवासी या शब्दप्रयोगाऐवजी Animist म्हणजे प्राणीपूजकहा शब्दप्रयोग वापरला जातो. खरेतर, 'आदिवासी म्हणजे निसर्गपूजक व वंशपरंपरागत देवदेवतांची पूजा, प्राणीपूजा करणारे व आजपर्यंत ज्यांनी कोणत्याही धर्माचा स्वीकार केलेला नाही, असे 'मूळनिवासी' लोक होत.[5]सर्वसाधारण आदिवासींची भौगोलिक व्याख्या अशी आहे की, 'ज्या स्थानिक टोळ्या दऱ्याखोऱ्यामध्ये, रानावनात राहतात व विशिष्ट पेहराव करतात आणि स्वतंत्र बोलीभाषा बोलतात ते आदिवासी होत.'[6] आंतरराष्ट्रीय आदिवासींच्या व्याख्येनुसार अनार्य लोक हे आदिवासीच असून ते मूळनिवासी आहेत.भारतात इतर परकीय लोक येण्यापूर्वीपासून येथे राहणारे लोक म्हणजे आदिवासी होय. आदीपासून राहणारे ते आदिवासीच;पण आज जंगलात, पहाडात राहणारे आदिम लोक म्हणजे आदिवासी होत.[7] असे म्हटले जाते.

आदिवासींचा पूर्व इतिहास

आदिम संस्कृतीचा आरंभ हा साधारणतः पाषाणयुगापासून असल्याचे मानले जाते. संस्कृत साहित्यात आदिवासी जमातींचा उल्लेख फार पुरातन काळी आलेला आहे. रामायण महाभारताचा काळ साधारणतः चार-पाच हजार वर्षापूर्वीचा असून आर्य भारतात आले त्यावेळी येथे अगोदरपासून वस्ती करून राहणाऱ्या जमाती त्यांना दिसल्या. आर्यांनी त्यांचा उल्लेख 'दस्यू' म्हणून केला आहे. त्याकाळी आदिवासी टोळ्यांना 'गण' म्हटले जात असे आणि यागणाच्या प्रमुखास 'गणपती' किंवा 'गणनायक' म्हणत. आदिवासींची राज्ये जशी हिमालयाच्या पायथ्याशी होती, तसेच इतर भागातही होती. ही गणराज्य गुलाम व्हावीत म्हणून त्यावेळच्या सम्राटांनी या गणराज्यांवर स्वाऱ्या करून अनेक गणनायकांना ठार मारले. मात्र एक गणनायक मारला गेला तरी दुसरा शूर आदिवासी गणनायक व्हायचा: त्यामुळे आदिवासींच्या राज्यांना म्हणजेच गणांना लढाई करून गुलाम करणे फार कठीण होते. याबाबत कौटिल्याने असे लिहिले आहे की, आदिवासी गणनायकांमध्ये आपसात भांडणे लावून, त्यांना दारूचे व्यसन लावून तसेच सुंदर स्त्रिया पाठवून त्यांची शक्ती कमी करावी; त्याशिवाय त्यांच्यावर विजय मिळवता येणार नाही. यावरून आदिवासी गण हे पराक्रमी असल्याचे दिसून येते. आदिवासी या देशाचे मूळ मालक असल्याने त्यांची या भूमीवर मोठी साम्राज्ये होती आणि भारत भूमीचा बहुतांश भूभाग आदिवासी राज्यांनी व्यापलेला होता. याप्रकारे आदिवासींचा गत इतिहास हा उज्वल परंपरांनी व शौर्यगाथांनी भरलेला असल्याचे दिसते.[8]

प्राचीन भारताच्या वैदिक वांग्मयात तसेच रामायण, महाभारत व स्मृतीग्रंथात आदिवासींचे उल्लेख आढळतात. शबर, रक्श, निषाद, किरात, पुलिंद, कोलीया, मोरिया इ. आदिवासी जमातीचा नामोल्लेख सापडतो. शिल्ली या आदिवासी जमातीचा



Sakri (Dhule)
PRINCIPAL
K.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule
Scanned with OKEN Scanner

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

उल्लेख ऋग्वेदात आहे. रामायणात किरात, निषाद, शबर या आदिवासींचा उल्लेख आहे. बेटावर राहणारे, कच्चे मांस भक्षण करणारे असा किरातांचा उल्लेख आहे. प्राचीन संस्कृत साहित्यात भिल्ल जमातीचा उल्लेख आढळतो. रामायणात शबरी या भिल्ल जमातीच्या स्त्रीचा उल्लेख येतो. महाभारतात पुलिंद व किरात या आदिवासी जमातींचा व एकलव्याचाही उल्लेख आढळतो. इ.स.पूर्व सातव्या शतकात आदिवासी गणराज्याचे उल्लेख आढळतात. त्याकाळात शबर व किरात लोक दंडकारण्यात (उत्तर महाराष्ट्र) राहत. म्हणजेच, हे आजचे भिल्ल आदिवासी असावे असे अनुमान काढता येते. डॉ.गोविंद गारे यांच्या निष्कर्षावरून विंध्य, अरवली व सातपुडा या पर्वतरांगाच्या सानिध्यात वास्तव्य करणारे आदिवासी हे विशेषत: भिल्ल होत.[9]

इंग्रजांच्या आगमनाने आदिवासींची मोठी हानी झाली. कारण ब्रिटिश कालखंडात सावकार व जमीनदारांनी आदिवासींची मोठ्या प्रमाणात पिळवणूक करण्यास सुरुवात केली. याविरोधात आदिवासींचे अनेक उठाव (1801,1807,1808) घडून आले. ते ब्रिटिशांनी सैन्यबळाच्या जोरावर दाबून टाकले. पुढे 1831-32 च्या दरम्यान एक आदिवासी उठाव घडून आला त्याला 'कोलचा उठाव' असे म्हटले जाते. सावकारांच्या दमनशाहीमुळे 1857 पूर्वी 1855 मध्ये संथाळांचा एक उठाव झाला. तर इ.स. 1895 मध्ये मुंडा या आदिवासी जमातीने बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वात एक उठाव घडवून आणला. आदिवासींची ही 'बिरसा चळवळ' हिंदू जमीनदार, सावकार आणि ब्रिटीश मिशनरी यांच्या विरोधात होती. पुढे 1911 मध्ये बस्तर'चा उठाव 'ताना भगत' यांच्या नेतृत्वात झाला व 1920 मध्येही आदिवासींचा उठाव झाला. याप्रकारे आपल्या हक्कांसाठी लढणारे आदिवासी हे शूरवीर व लढाऊ असल्याचे स्पष्ट होते.[10]

अमेरिकेच्या शोधापासून पश्चिमी लोकांची आदिवासींकडे दृष्टी वळली. कारण अमेरिकेत वसाहत करणाऱ्यांना स्थानिक आदिवासींशी वारंवार युद्धे करावी लागली, त्यावेळी मॉंटेन यांनी आदिवासी संस्कृतीत ढवळाढवळ न करण्याचा सल्ला दिला होता. त्यांच्या मते, 'रानटी फुलांइतकेच आदिवासीही रानटी असतात'. 17 व्या शतकात आदिवासींच्या सुखमय जीवनावर आधारलेले बरेच ललित साहित्य लिहिले गेले. 1640 मध्ये वॉल्टर हेमांड'ने मादागास्कर बेटावरील लोक जगात सर्वात सुखी असल्याचे म्हटले होते. तर रुसो'ने रानटी आदिमानवाच्या स्वतंत्र अशा रम्य जीवनासंबंधी विचार मांडल्यापासून 'नोबेल सॅव्हेज' या संज्ञेस प्रसिद्धी मिळाली. पुढच्या शतकात कॅप्टन कूक व इतर प्रवाशांच्या प्रवास वर्णनांतून हाच सूर निघतो. कॅप्टन कुकने ऑस्ट्रेलियाचे आदिवासी यूरोपीय लोकांपेक्षा सुखी आहेत असे म्हटले होते.[11]

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींवरीलआधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि सामाजिक बदल स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय संविधानाने आदिवासींसाठी अनुसूचित जमाती असा शब्दप्रयोग केला. भारतीय संघराज्य हे 29 घटकराज्ये आणि सात केंद्रशासित प्रदेश मिळून बनलेले आहे. भारताने जगाच्या भू-भागापैकी 2.4 टक्के भूप्रदेश व्यापलेला असून जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी 17.5 टक्के लोकसंख्या भारतात राहते. 2011 च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत 8.6 टक्के लोकसंख्या आदिवासींची आहे.मध्यप्रदेशानंतर महाराष्ट्र हे सर्वाधिकआदिवासी लोकसंख्येचे राज्य आहे.महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येच्या तुलनेत 9.4 टक्के आदिवासी लोकसंख्या असून भारताच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत 10.1 टक्के आदिवासी लोकसंख्या महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्र 45 अनुसूचित जमाती असून राज्याच्या वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशात त्या विखुरलेल्या आहेत. जसे की सह्याद्री, सातपुडा, गोंडवाना विभाग. सह्याद्री पर्वतरांगाच्या विभागात महादेव कोळी, कोकणा, वारली, ठेका, कातकरी, मल्हार कोळी व ढोर कोळी या जमातींचे वास्तव्य आहे. सातपुडा प्रदेशात प्रामुख्याने भिल्ल आणि कोरकू तर गोंडवाना प्रदेशात आंध, होलम, होलबा या आदिवासी जमाती प्रमुख आहेत. महाराष्ट्रातील आदिवासी हे सामाजिक, आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून अत्याधिक मागासलेले घटक आहेत. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये आदिवासी हे मानव विकास निर्देशांकाच्या मोजपट्टीतअत्याधिक मागासलेले असल्याचे दिसते. म्हणून त्यांच्या मागासलेपणाची करणे शोधून त्यावर उपाययोजना कार्यान्वित करणे गरजेचे आहे.
1 जुलै 1998 रोजी धुळे जिल्ह्याचे विभाजन होऊन नंदुरबार या आदिवासी जिल्ह्याची निर्मिती झाली.नंदुरबार जिल्ह्यातून राज्य व राष्ट्रीय महामार्ग जातात तसेच पश्चिम रेल्वेमार्ग देखील नंदुरबार मधून जातो. नंदुरबार महाराष्ट्रातील सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या असलेला तिसरा जिल्हा आहे. येथे भिल्ल, पावरा, कोकणी या प्रमुख आदिवासी जमाती वास्तव्यास असून त्यांच्यातील



Sakri (Dhule)
PRINCIPAL
K.B.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule
Scanned with OKEN Scanner

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

अनेक उपप्रकारही याठिकाणी आढळतात. 2011 च्या जनगणनेनुसार नंदुरबार जिल्ह्यात 69.28 टक्के आदिवासी लोकसंख्या असून ती प्रामुख्याने डोंगरी व ग्रामीण भागात वसलेली आहे. जिल्ह्यातील अक्कलकुवा, अक्राणी (धडगाव), तळोदा व नवापूर या चार तालुक्यांमध्ये जिल्ह्याच्या तुलनेत आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. तसेच राज्याच्या लिंग गुणोत्तराच्या (929) तुलनेत नंदुरबार जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर (978) चांगले आहे. जिल्ह्याचा साक्षरता दर हा 64.38 टक्के एवढा असून तालुकानिहाय विचार केल्यास सर्वाधिक साक्षरता दर नंदुरबार तालुक्याचा (71.36) असून सर्वात कमी साक्षरता दर अक्राणी (धडगाव), तालुक्याचा (53.31) आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावाने मानवी जीवनात आमूलाग्र बदल होऊ लागले; त्यामधून आदिवासीही सुटले नाहीत.

आधुनिक तंत्रज्ञान आणि जनसंचार माध्यमांमुळे आदिवासींचा आधुनिक संस्कृतीशी परिचय होऊ लागला आहे. आधुनिक तंत्रज्ञान व अत्याधुनिक यंत्र-तंत्रे आदिवासी भागातही पोहोचली आहेत. जसे की, मोटार सायकल, चारचाकी वाहने, ट्रॅक्टर्स, टीव्ही, डीटीएच सर्विस, सेलफोन, स्मार्टफोन, इंटरनेट आदी. याप्रकारे आदिवासींचा आधुनिकीकरणाशी प्रत्यक्ष परिचय होऊन त्याचा प्रभाव त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनावर पडत आहे. परिणामी आदिवासींमध्ये सामाजिक बदलाची प्रक्रिया सुरू झाली आहे. बदलते जीवनमान, राहणीमान, वेशभूषा, केशभूषा यामधून आदिवासींमध्ये सामाजिक बदलाची प्रक्रिया सुरू झाली असल्याचे दिसते. तरीही संपूर्ण आदिवासी समाजात या सामाजिक बदलाच्या प्रक्रियेने प्रवेश केला आहे, असे मात्र कदापि म्हणता येणार नाही. पण शासनाच्या प्रयत्नांमुळे आदिवासींचे वास्तव्य असलेल्या भागात विकसित होत असलेल्या रस्त्यांमुळे डोंगरी व ग्रामीण भागातील आदिवासी लोक हळूहळू आपली कृषी उत्पादने घेऊन विक्रीसाठी शहरांमध्ये येऊ लागले आहेत.आदिवासी भागात होत असलेल्या दळणवळणाच्या साधनांच्या विकासामुळे आदिवासींची साधी अर्थव्यवस्था हळूहळू बाजार अर्थव्यवस्थेकडे मार्गक्रमण करू लागली असून हा एक सकारात्मक बदल असल्याचे म्हणता येईल.

### सारांश व निष्कर्ष

आदिवासी समाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अगदी मर्यादित केला जातो. शिकार, मासेमारी, शेती यासारख्या आर्थिक क्रियांमध्ये आदिवासी लोक जी उपकरणे, हत्यारे व अवजारे वापरतात ती अत्यंत साधी व पारंपारिक असतात. शिकारीसाठी धनुष्यबाण, मासे पकडण्याची जाळी, जनावरांचे व शेळया कोंबड्याचे संरक्षण करण्यासाठी बंदिस्त जागा. याप्रकारे आदिवासींचे तंत्रविद्यात्मक ज्ञान अगदी मर्यादित व तोडके आहे. असे असले तरी केंद्र व राज्य शासनाच्या प्रयत्नांमधून आदिवासी मुला-मुलींच्या शिक्षणासाठी जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणी तसेच काही मोठ्या गावांमध्ये निवासी शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहे स्थापन केली जात आहे. परिणामी आदिवासी समाजात शिक्षणाचा प्रसार होऊ लागला असून शिक्षित आदिवासी तरुण-तरुणी आदिवासींमध्येआधुनिक तंत्रज्ञानाचे वाहक ठरत आहेत.शासनाने आदिवासींच्या विकासासाठी अनेक योजना राबवून त्यांच्या रक्षणासाठी कायदे केलेले आहेत. संविधानाने बहाल केलेल्या तरतुदींचा फायदा होऊन शैक्षणिक सोयी-सुविधा, शासकीय नोकऱ्या, राजकीय प्रतिनिधित्व व इतर लाभ मिळालेल्या आदिवासी लोकांमध्ये प्रामुख्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार होऊन सामाजिक बदल होताना दिसत आहे.

### संदर्भ सूची

1) तर्कतीर्थ श्री.लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), 'मराठी विश्वकोश' खंड दोन, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, 2000, पृ.28
2) कित्ता
3) कित्ता, पृ.29
4) दास्ताने संतोष, 'भारत एक पाहणी', दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे,1999, पृ.64
5) दिलीप चतुरसिंग वळवी, 'धुळे जिल्ह्यातील आदिवासींची पार्श्वभूमी', 'नहारकंद - होळी विशेषांक', 1997, पृ. 94- 95
6) कित्ता
7) मेघराज कपूरडेरिया, 'कंवर आदिवासींचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2012, पृ.41



Sakri (Dhule)
PRINCIPAL
T.S.B's Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal Sakri, Dist Dhule
Scanned with OKEN Scanner

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

8) तित्ता, पृ.41,42
9) गजेंगव ज. भामरे, 'आदिवासींचे उठाव', अपरांत प्रकाशन, पुणे, 2015, पृ.2
10) उपरोक्त, मेघराज कपूरडेरिया, 'कंवर आदिवासींचे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन', 2012, पृ.44
11) उपरोक्त, तर्कतीर्थ श्रीलक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), 'मराठी विश्वकोश' खंड दोन, पृ.29

TSS's Smt. V.U. Patil Arts and Late Dr. B.S. Desale Science College
Sakri (Dhule)

PRINCIPAL
T.S.S's. Smt V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule



Scanned with OKEN Scanner